# जिल्हाधिकारी व जिल्हादंडाधिकारी कार्यालय, ठाणे

## जाहिर निवेदन

शासन सामान्य प्रशासन विभाग, यांचेकडील परीपत्रक क्रं.प्रसुधा२०११/प्र.क्रं.१८९/११/१८ अ दिनांक २६ सप्टेंबर २०१२ नुसार फेब्रुवारी महिन्याचे पहिल्या सोमवारी, लोकशाही दिन दिनांक ३/२/२०२०, रोजी दुपारी ०१.०० वाजता समिती सभागृह,पहिला मजला, नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथे **जिल्हास्तरीय लोकशाही दिन** आयोजित करणेत येत आहे. सर्व नागरिकांना विनंती करण्यात येत आहे की, दिनांक ३/०२/२०२०, चे लोकशाहि दिनासाठी त्यांनी त्यांची तक्रार विहित नमुन्यात तीन प्रतीत १५ दिवस आधी म्हणजेच दिनांक १८/०१/२०२० पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालय, ठाणे येथील नोंदणी शाखेमध्ये पाठविणे आवश्यक आहे. लोकशाहिदिनी अर्जदार यांनी स्वत: उपस्थित रहाणे आवश्यक आहे. अर्जदार यांची तक्रार/निवेदन वैयक्तीक स्वरुपाची असणे आवश्यक आहे. लोकशाहि दिनामध्ये तक्रार करणेपूर्वी ,अर्जदाराने प्रथम संबंधित कार्यालयाकडे ,तसेच त्यांचे वरिष्ठ कार्यालयाकडे तक्रार दाखल करावी. संबंधित कार्यालयाकडे/वरिष्ठ कार्यालयाकडे केलेल्या तक्रारीच्या प्रती लोकशाही दिनी सादर करावयाच्या अर्जा सोबत जोडाव्यात. तक्रारदारांबरोबर त्रयस्थाने येण्याची आवश्यकता नाही. एका तक्रारी अर्जात एकच तक्रार असावी, एकापेक्षा अनेक तक्रारी असलेला अर्ज स्विकारला जाणार नाही. तक्रारदाराने प्रथम तालुका लोकशाही दिनामध्ये अर्ज करणे अनिवार्य आहे. तालुका लोकशाही दिनामध्ये अर्ज केला नसल्यास, सदरहु अर्ज जिल्हा लोकशाही दिनामध्ये स्विकारला जाणार नाही.प्रकरण जिल्हाधिकारी कार्यालयाशी संबंधित असल्यास अर्ज थेट स्विकारण्यांत येतील.

लोकशाही दिनांत खालील बाबीशी संबंधी अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

१.न्याय प्रविष्ठ प्रकरणे
२. राजस्व/अपिल
३. सेवा विषयक, आस्थापनाविषयक बाबी
४. विहित नमुन्यात नसणारे व त्या सोबत आवश्यक त्या कागदपत्राच्या प्रती न जोडलेले अर्ज़
५. अंतिम उत्तर दिलेले आहे/देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्ज
६. तक्रार/निवेदन वैयक्तिक स्वरुपाची नसेल तर तसेच कोणत्या ही राजकीय पक्षाच्या/लोकप्रतिनिधीच्या/संस्थेच्या लेटर हेडवरील अर्ज स्विकारला जाणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी.

ठिकाण : ठाणे
दिनांक :-७/०१/२०२०

स्वाक्षरी/-
(संगीता पवार)
जनसंपर्क अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे

प्रत-१) जिल्हा माहिती अधिकारी ठाणे यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.

ठाणे जिल्हा सत्र न्यायालयासमोर, कोर्टनाका, ठाणे (पश्चिम) तालुका व जिल्हा ठाणे – ४००६०१.
संपर्क क्र. ०२२ – २५३४ ३६३६ /२५३४ १७३७ /३९ ▪ ई–मेल : collectorofficethane@gmail.com ▪ Website : www.thane.nic.in

२) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद ठाणे
३) पोलीस उपायुक्त,ठाणे
४) जिल्हा पोलीस अधिक्षक ठाणे ग्रामीण
५) कार्यकारी अभियंता ,पाटबंधारे विभाग ,ठाणे
६) कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे
७) प्रादेशिक परिवहन अधिकारी , ठाणे
८) जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, ठाणे
९) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जिवन प्राधिकरण, ठाणे
१०) जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी ठाणे

२/- कृपया लोकशाही दिनी आपण आपलेकडील जबाबदार अधिकारी यांनी उपस्थित रहावे. आपले उपस्थितीबाबत शासनास विवरणपत्र ३ ब मध्ये अहवाल सादर करणेचा असतो. त्यामुळे कृपया उपस्थित रहावे हि विनंती.

(संगीता पवार)
जनसंपर्क अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय ठाणे